Supported by

Implemented by

# IAdapt

## भारतीय शहरांमध्ये हवामान आधारित अनुकूलनासाठी एकात्मिक ग्रामीण शहरी पाणी व्यवस्थापन



'भारतीय शहरांमध्ये हवामान आधारित अनुकूलनासाठी एकात्मिक ग्रामीण शहरी पाणी व्यवस्थापन **(IAdapt)** हा इंटरनॅशनल डेव्हलपमेंट रिसर्च सेंटर (आयडीआरसी) कॅनडा समर्थित तीन वर्षांचा प्रकल्प आहे. ह्या प्रकल्पाची अंमलबजावणी आयसीएलइआय – शाश्वत विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, दक्षिण आशिया (स्थानिक पर्यावरणविषयक पुढाकारांसाठीची आंतरराष्ट्रीय परिषद) ही संस्था, एथेना इन्फोनॉमिक्स एलएलसी, इंटरनॅशनल वॉटर मॅनेजमेंट इन्स्टिटयूट (आयडब्ल्यूएमआय), श्रीलंका  आणि इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मद्रास यांच्या भागीदारीत करीत आहे.

हा प्रकल्प भारतीय शहरांना जल व्यवस्थापनाच्या पारंपारिक पद्धती (ज्याच्या अंतर्गत पाणी पुरवठा, सांडपाणी आणि पावसाचे पाणी यांचा वेगवेगळे विभाग म्हणून विचार करण्यात येतो तसेच स्वतंत्रपणे नियोजन, अंमलबजावणी आणि कार्यरत केले जातात)  बदलून 'एकात्मिक जल संसाधन व्यवस्थापन (आयडब्ल्यूआरएम)' आणि 'एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापन (आययूडब्ल्यूएम)' यांच्या तत्त्वांवर आधारित 'एकात्मिक दृष्टीकोन' अंगीकारून जल व्यवस्थापनासाठी सक्षम करेल. हा प्रकल्प महाराष्ट्रातील सोलापूर आणि आंध्र प्रदेशातील विजयवाडा या शहरांमध्ये राबविण्यात येत आहे.



## संशोधनातील महत्वाचे प्रश्न

A. एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनास अनुसरून तसेच त्याचा उपयोग पाणलोट क्षेत्रांसाठी देखील करून शहरांची हवामान बदलांबद्दलची अनुकूलन क्षमता कशी वृधिंगत करण्यात येईल?

B. जलसंसाधन व्यवस्थापनावर सतत संवाद घडवण्यासाठी आणि एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापन (आययूडब्ल्यूएम) –आधारित दृष्टिकोन घेण्यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रमुख हितधारकांना (स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था प्रमुख, इत्यादी) कोणते घटक आणि प्रोत्साहनपर योजना प्रभावी ठरतील?

C. एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापनाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तसेच शहराच्या पाणलोट क्षेत्रामधील सेवांच्या चालना व विकासासाठी कोणती आर्थिक यंत्रणा सक्षम ठरेल?

## प्रमुख उद्दिष्ट


पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी संस्थात्मक पद्धतीने हवामानातील बदलांना अनुकुलीत उपायांद्वारे तसेच एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापन (शहर स्तरावर) आणि एकात्मिक जलसंधारण (पाणलोट क्षेत्र स्तरावर) यांच्या तत्वांना अनुअसरुन पाणी सुरक्षिततेत सुधारणा करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी आणि सर्वांच्या सहभागाने पाणलोट क्षेत्राचे नियोजन करण्यासाठी बहु–हितधारक ग्रामीण तसेच शहरी संवाद, हवामानातील बदलांवर आधारित विविध उपायांच्या निर्णयाचे समर्थन करण्यास सोयीस्कर व सोपे टूल, पाणलोट क्षेत्र कृती आराखडा आणि बहुउद्देशीय वित्तपुरवठा दृष्टिकोन हे मुद्दे मार्गदर्शक ठरतील. या योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या पथदर्शी व प्रायोगिक प्रकल्पामार्फत पाणलोट क्षेत्र कृती आराखड्याची अंमलबजावणी कशी करावी ते दर्शविण्यात येईल.

## प्रकल्पाचे फायदे

- सर्व हितधारकांच्या सहभागातून आणि एकात्मिक प्रशासनाद्वारे एक आदर्श जलस्त्रोत व्यवस्थापन यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी दोन्ही शहरांमध्ये शहरी तसेच ग्रामीण हितधारकांची समिती बनवणे.
- हवामानातील बदलांवर आधारित माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठीच्या यंत्रणेचा तसेच निर्णय क्षमतेचा विकास करण्यात येईल
- पाणलोट क्षेत्र कृती आराखडा तयार करण्याच्या क्षमतेचा विकास करण्यासाठी IAdapt Framework द्वारे स्थानिक स्वराज्य संस्थाना सक्षम करण्यात येईल
- 'पाणलोट क्षेत्र आधारित पाणी व्यवस्थापन' या दृष्टीकोनाचे फायदे दाखवण्यासाठी एकात्मिक शहरी पाणी व्यवस्थापनाच्या आणि एकात्मिक जलस्त्रोत व्यवस्थापनाच्या तत्त्वांचा वापर करून प्रत्येक शहरातल्या एका सूक्ष्म पाणलोट क्षेत्रासाठी पाणलोट क्षेत्र कृती आराखडयाची निर्मिती केली जाईल
- एकात्मिक पाणी व्यवस्थापनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना शाश्वत वित्तपुरवठा होण्यासाठी विविध पर्यायंचा विचार करून धोरणात्मक योजना आखण्यात येईल



## प्रकल्पातील उपक्रम





## प्रकलपतील शहरे

सोलापूरः महत्वाची माहिती

- लोकसंख्या (2011): 9.51 लाख
- क्षेत्रः 178.57 चौ.कि.मी.
- पाण्याचे स्त्रोतः 4 (उज्जनी धरण हाच केवळ बारमाही स्रोत असून शहरापासून अंदाजे 100 किमी अंतरावर आहे)
- भारत सरकारच्या स्मार्ट सिटीज मिशन अंतर्गत सोलापूर शहराची निवड कअरण्यात आली आहे
- प्रमुख आर्थिक क्षेत्रेः वस्त्रोद्योग, साखर कारखाने, शेती व बीडीची निर्मिती
- प्रमुख समस्याः पाणी उपलब्धता, जुने पाणी पुरवठा नेटवर्क, जलस्रोतांचे प्रदूषण, उद्योग आणि सिंचन क्षेत्राची वाढीव पाणी मागणी; पाण्याच्या संदर्भातील प्रादेशिक संघर्ष




विजयवाडाः महत्वाची माहिती

- लोकसंख्या (2011): 10.48 लाख
- क्षेत्रः 61.88 चौरस किमी
- पाण्याचे स्त्रोतः 2 (कृष्णा नदी ही मुख्य स्रोत आहे)
- भारत सरकारच्या अटल मिशन फोर रेज्युएनेशन आणि अर्बन ट्रॅन्सफोर्मेशन (एएमआरयूटी) योजने अंतर्गत विजयवाडा शहराची निवड करण्यात आली आहे
- प्रमुख आर्थिक क्षेत्रेः कृषी उत्पादने, ऑटोमोबाइल बॉडी बिल्डिंग, हार्डवेअर, वस्त्रोद्योग, कन्झ्युमर गुड्स आणि छोट्या उद्योगांची प्रक्रिया केंद्रे
- प्रमुख समस्याः नैसर्गिक आपत्ती जसे पूर आणि चक्रीवादळे, पर्जन्यमानातील उच्च बदल, जलस्रोतांचे प्रदूषण

## प्रकल्प भागीदार

**आयसीएलइआय – शाश्वत विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, दक्षिण आशिया (स्थानिक पर्यावरणविषयक पुढाकारांसाठीची आंतरराष्ट्रीय परिषद):** आयसीएलइआय – दक्षिण आशिया ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संघटनेची जगातील आघाडीच्या संस्थेची दक्षिण आशियाई शाखा आहे, ज्यात 1500 पेक्षा अधिक महानगरे, शहरे, शहरी विभाग व नगरे आहेत. वाढत जाणारया स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्य संख्येबरोबरच, गेल्या काही वर्षात आयसीएलइआय दक्षिण आशिया हि पर्यावरण व शाश्वत शहरी विकास या क्षेत्रातील एक आघाडीची संस्था म्हणून उभारी घेत आहे. http://southasia.iclei.org/

**एथेना इन्फोनॉमिक्स एलएलसीः** एथेना इन्फनोमिक्स एक धोरण संशोधन आणि विकास विश्लेषिकी संस्था असून ती जगभरातील विकास आणि समाकलित वाढीच्या समस्या सोडविण्यासाठी माहिती आणि सामाजिक विज्ञान संशोधनाच्या वापरास बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करते. www.athenainfonomics.in

**इंटरनॅशनल वॉटर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट (आयडब्ल्यूएमआय), श्रीलंकाः** इंटरनॅशनल वॉटर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट (आयडब्ल्यूएमआय) एक नॉन–प्रॉफिटेबल, वैज्ञानिक संशोधन संस्था असून विकसनशील देशांमधील पाणी आणि जमीन संसाधनांचा शाश्वत वापर यावर लक्ष केंद्रित करते. www-iwmi-cgiar-org

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मद्रासः** भारतीय तंत्रज्ञान संस्था – मद्रास, उच्च तंत्रज्ञानातील शिक्षणासाठी, मूलभूत आणि व्यावहारिक संशोधनासाठी भारतातील अग्रणी शेक्षणिक संस्थांपैकी एक आहे. www-iitm-ac-in


### संपर्क

**ICLEI - Local Governments for Sustainability, South Asia**
C-3, Lower Ground Floor, Green Park Extension, New Delhi - 110016, India
Tel: +91 – 11 – 4974 7200; Fax: +91 - 11 - 4974 7201; Email: iclei-southasia@iclei.org, Website: http://southasia.iclei.org/



This work was carried out with the aid of a grant from the International Development Research Centre, Ottawa, Canada. The views expressed herein do not necessarily represent those of IDRC or its Board of Governors.